# सितारा मंझिल

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**सितारा मंझिल : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ २३०/-

# सितारा मंझिल

# १

आकाश ढगांनी भरलेलं असल्यामुळे रात्र अधिकच अंधारी भासत होती. पाखडल्या जाणाऱ्या धान्याचा कोंडा उडावा त्याप्रमाणे पावसाची उगीच पातळ भुरभुर अधून मधून पडत होती. पण वाऱ्याचे जोराचे झोत चालू होते. भल्या मोठ्या ऐटबाज मोटारीतून चाललेले जाफर जंग गादीला रेलून आणि मऊमऊ उशीवर मान टाकून डोळे मिटून स्वस्थ पडले होते. बाहेर पाहण्यासारखं काही नव्हतंच. गाडीच्या काचा वर सरकविलेल्या होत्या. गाडी मजेत चालली होती. संबंध दिवस हैदराबादला कामाच्या धांदलीत घालविल्यामुळे मोटारीतली ती डुलकी त्यांना फार सुखाची वाटत होती...

मध्येच रस्त्यावरचा खडा मडगार्डवर वाजल्यामुळे जाफर जंग जागे झाले. उशीवरची मान किंचित चाळवून त्यांनी डोळे उघडले. ड्रायव्हरच्या सीटपुढच्या साऱ्या वाटोळ्या तबकड्या त्यांना दिसल्या. वेग दाखविणाऱ्या तबकडीला कांटा पस्तीस आणि चाळीस या दोन आकड्यांमध्ये सरकत होता. शेजारच्या तबकडीतल्या काट्यावरून पेट्रोल चिकार शिल्लक असल्याचं दिसत होतं. वेळ दाखविणाऱ्या घड्याळांत साडे अकरा वाजून गेले होते. दिव्यांनी लख्ख उजळलेल्या त्या साऱ्या तबकड्या गाडीचा कोरेपणाही दर्शवीत होत्या. जाफर जंगनी ही भारी किंमतीची गाडी पंधरा दिवसांपूर्वीच खरेदी केली होती. या गाडीच्या किंमतीचा चेक लिहिताना ते मनाशी म्हणाले होते, लहर लागली तर अशा दहा गाड्या घेईन, मला काय कमी आहे? आधीच कित्येक वर्षापासून वाढलेला त्यांचा धंदा एकदम गेल्या बारा महिन्यात

फारच भरभराटला होता. रझाकार चळवळीला मुक्त हस्तानं मदत केल्यामुळे ते म्हणतील ती मोठमोठी कंत्राटं त्यांना सहज मिळाली होती. रझाकाराचं राजकारण दिवसेंदिवस प्रबळ होत होतं. राज्यांतील हिंदू नामशेष करण्याचं धोरण यशस्वी होत होतं. निजामी सत्ता आता लवकरच सार्वभौम होणार होती. मुसलमानांच्या वाट्याला सारी सुखं येणार होती. जाफर जंग म्हणजे तर शाहे उस्मान आणि रझाकार यांच्या मर्जीतले एक प्रमुख खानदानी उद्योगपती होते. भविष्याबद्दलच्या त्यांच्या स्वप्नांचा गुलाबी रंग रोजच्या रोज अधिकाधिक गडद होत होता...

समोरच्या झगझगीत तबकड्यांकडे पाहताना स्वत:च्या कर्तृत्वाबद्दल आणि यशाबद्दल मनांत आलेल्या विचारांनी जाफर जंगना मोठी खुषी वाटली. त्या खुषीतच त्यांनी मऊ उशीच्या खोबणीत मान पुन्हा चाळविली. आणि सहज खिडकीच्या काचेतून पाहिलं. दूर अंतरावर एखादी चांदणी लुकलुकलेली दिसावी त्याप्रमाणे त्यांना प्रकाशाचा ठिपका दिसला. तो इतका अस्पष्ट होता की या रस्त्यानं प्रथमच जाणाऱ्या प्रवाशाच्या ध्यानांतही तो आला नसता. परंतु जाफर जंगना तो सहज दिसला. कारण 'सितारा मंझिल' नावाचं त्यांचं जे बादशाही निवासस्थान चांदनगर शहराच्या पश्चिमेकडच्या सीमेला जराशा उंचवट्यावर होतं त्यातल्या दिव्यांचा तो प्रकाश होता. तो दिसताच जाफर जंगनी ओळखलं की चांदनगरच्या अलीकडे तिसऱ्या मैलाच्या दगडापाशी गाडी असली पाहिजे. इथे गाडी आल्याबरोबर सितारा मंझिलमधले दिवे लुकलुकलेले दिसतात हे त्यांना आता माहीत झालं होतं. ते मनाशी म्हणाले, आता आठ दहा मिनिटांत घरी पोचू. साडे अकरा वाजून गेले आहेत. पण सितारा मंझिलमध्ये दिवे दिसत आहेत त्या अर्थी मंडळी वाट पाहात बसली असावीत... आज रात्री लवकर घरी येण्याचं त्यांनी कबूल केलं होतं. परंतु त्यांना उशीर झाला होता. त्यांची बिवी, त्यांची लाडकी छोकरी जुलिया आणि त्यांच मुलगा हुसेन त्यांच्या वाटेकडे डोळे लावून बसले असतील... हुसेनचा विचार मनात येताच जाफर जंगनी तोंड वाईट केलं. जुलियाप्रमाणेच तोही त्यांचा लाडका होता. पण होता! होता तसाच राहिला असता तर खुदाची मेहेरबानी म्हणता आली असती. पण...

नकोच हा विचार अशा अर्थानं जाफर जंगनी मान झटकली, आणि खिशातून सिगरेट काढून पेटवून गाडीच्या दिव्यांच्या झोतात दिसणाऱ्या गुळगुळीत, रुंद, भिजलेल्या सडकेकडे ते पाहात राहिले.



सितारा मंझिलमधील दिवे मोटारीतून घरी येणाऱ्या जाफर जंगना ज्याप्रमाणे तिसऱ्या मैलाच्या दगडापासून नेहमी दिसू लागत त्याप्रमाणे त्यांची गाडी येत असल्याची खूण तीन मैलांच्या अंतरावरून नव्हे पण शहराच्या पूर्व सीमेपाशी गाडी आली की त्यांच्या घरच्या मंडळींना नेहमी पटत असे. कारण त्यांच्या गाडीच्या पुढच्या बाजूस पाण्याच्या टाकीच्या झाकणांवर जे निजामी निशाण होतं त्याच्या दांडीच्या टोकावर रात्रीच्या वेळेस बारीक बारीक हिरव्या दिव्यांचा एक गुच्छ चमकत असे आणि पुढच्या दोन्ही बाजूस असलेल्या दोन झगझगीत दिव्यांशेजारी असेच हिरव्या रंगाचे लहान दिवे चमचमत असत. हिरव्या रंगाचे हे तीन प्रकाशपुंज सितारा मंझिलमधून बऱ्याच अंतरावरून दिसत असत व ते दिसू लागले की गवाक्षांत उभं राहून वाट पाहणारी जुलिया मोठ्या दिवाणखान्यांत बसलेल्या आपल्या आईला वर्दी देत असे, आब्बाजानची गाडी आली. मग थोड्याच वेळानं ड्रायव्हरनं मुद्दाम जास्त वेळ वाजविलेल्या हॉर्नचा आवाज कानांवर येई व त्या आवाजानं जुलियाची खात्रीच पटे की आपल्या बापाची गाडी आली.

आजही असं झालं असतं. पण आज जुलिया गवाक्षांत उभी नव्हती. तिचे मामा अश्रफअली हुसेनच्या तेविसाव्या वाढदिवसासाठी दोन दिवस राहावयास म्हणून दुपारच्या गाडीनं आले होते, त्यांच्या गप्पा ऐकण्यांत जुलियाची आई, जुलिया आणि हुसेन तिघंही रंगून गेली होती. अश्रफअली म्हणजे एक बोलघेवडे, आनंदी आणि विनोदी गृहस्थ होते. त्यांची वाणी भारी मिठास होती, आणि त्यांच्याजवळ परोपरीच्या गोष्टींचा कधी न संपणार संग्रह होता. लहानपणी जुलिया आणि तिच्याहून दोन अडीच वर्षांनी मोठा असलेला हुसेन अश्रफअलींच्या मांडीवर व खांद्यावर चढून ''मामू कहानी चाहिये, कहानी!'' म्हणून हट्ट धरीत त्या वेळेस ''अच्छा भाई, सुनो'' म्हणून त्यांच्या गोष्टी सुरू होत. ''एक था चुव्वा,'' ''एक था बंदर'', ''एक थी बिल्ली'' अशा प्रकारे सुरू होणाऱ्या त्यांच्या गोष्टी कितीदाही ऐकल्या तरी जुलिया आणि हुसेन यांना त्यांची गोडी अपुरीच वाटे. ''एक था राजा'' आशा प्रारंभाच्या त्यांच्या गोष्टी तर तीन तीन दिवस चालू राहात; व शेवटी बहिणीच्या घरचा मुक्काम संपविण्याचा दिवस आला की आदल्या रात्री त्यांना त्या संपवाव्या लागत, आता जुलिया वीस वर्षांची झाली होती. हुसेन तेवीस वर्षांचा झाला होता. पण या वयातही त्यांना आवडतील अशा दुसऱ्या गोष्टी अश्रफमामूंजवळ काही कमी नव्हत्या. शिवाय

ते कवी होते, व जुन्या पर्शियन कवितांचं त्यांचं पाठांतर दांडगं होतं. एकेक कविता ते गाऊन दाखवू लागले की ऐकणाराला ते मंत्रमुग्ध करून टाकीत.

आज जाफर जंगची गाडी चांदनगरच्या अलीकडे तिसऱ्या मैलावर आली त्या वेळेस सितारा मंझिलमधल्या मोठ्या दिवाणखान्यांत अश्रफमामूंच्या गोष्टी अणि कविता ऐकण्यातच मंडळी गुंग झालेली होती. जुलियाची आई सकिनाबेगम रेशमांचं भरतकाम करीत मधोमधच्या कोचापलीकडच्या किनकाफी गादीच्या एका स्टुलावर दिव्याखाली बसली होती. उद्या हुसेनच्या वाढदिवसनिमित्त ती त्याला इतर मूल्यवान भेटींबरोबर जो सुंदर रेशमी उशीचा अभ्रा देणार होती त्यावरच्या पक्ष्यांच्या पंखांतले अंजिरी रंग अजून भरायचे राहिले होते. आज रात्री जरूर तर जागत बसून हे काम तिला पुरं करायचं होतं. अश्रफमामूची गोष्ट चालू असताना मध्येच ''मा! ओ मा सुना?'' म्हणून जुलिया किंवा हुसेन तिचं लक्ष वेधी. ती सांगे, ''हां हां मै सुनती हूं'' पण टाके घालणाऱ्या तिच्या गोऱ्यापान हातांचा उद्योग काही थांबत नसे. अश्रफमामू चेष्टेने म्हणत, ''जाऊ द्या रे पोरांनो, तिला थोडीच मी गोष्ट सांगतो आहे. ती आता झाली बुढी.'' जुलिया आणि हुसेन मोठ्यांदा हसत. एकदा सकिनानं मान वर उचलून भावाकडे लटक्या रागानं पाहून विचारलं, ''आणि तू काय अगदी ऐन जवानीत आहेस? म्हणे मी बुढी झाले. माझी उमर किती समजतोस तू? सांग तरी.''

अश्रफअली म्हणाले, ''तुझी उमर पंचेचाळीसच्या आतली आहे माहीत आहे मला.''

''म्हणजे बुढी झाले होय?''

''देख सकीना'' अश्रफअली डोळे मिचकावीत म्हणाले, ''माझा हिशेब ऐक. तुझा नवरा जाफर जंग देखील अजून पन्नाशीच्या फारसा पुढे गेलेला नाही. पण तो आता लागला आहे पैशाच्या आणि मानमरातबच्या नादाला. बाकी कसली देखील गोडी त्याला उरलेली नाही. अशा माणसाला म्हातारा म्हणावं असं एक पर्शियन कवी सांगतो. तेव्हा तुझा नवरा बुड्ढा झाला हे तर खरं. आणि त्यांची तू बायको, तेव्हा तू देखील.''

यावर सकीना मान झटकून म्हणाली, ''हां हां, बस्स कर तुझं शहाणपण'' आणि तिनं आपलं भरतकाम जोराजोरानं सुरू केलं.



हुसेन आणि जुलिया कोचावर अश्रफच्या दोन्ही बाजूस बसली होती. जुलियाच्या मांडीवर 'चमन' नावाचं तिचं आवडतं नकट्या नाकाचं, झिपऱ्या केसांचं, ठेंगण्या बांध्याचं, चकचकीत चॉकलेट रंगाचं कुत्रं मजेत पडलं होतं. मधेच मान वर करून ते जुलियाकडे बघे, आणि आपल्या नजरेनं तिला विचारी, माझ्या अंगावरून हात फिरविण्याचं बंद का केलंस, जुलिया त्याच्याकडे बघे, हंसे आणि ''बदमाष'' असं म्हणून त्याला रागानं चापट मारल्यासारखं करी, पण मग त्याला अधिकच जवळ ओढून घेऊन त्याच्या मखमली अंगावरून हात फिरवू लागे. मात्र तिचं खरं लक्ष चमनशी खेळण्यापेक्षा अश्रफमामूंच्या गोष्टीकडेच होतं. हुसेन तर जुलियाप्रमाणे कसला चाळाही करत नव्हता. तो अगदी एकचित्तानं मामाच्या गोष्टी ऐकत होता. गोष्ट सांगता सांगता अगर एखादी कविता म्हणून दाखविता दाखविता अश्रफअली त्या दोघांकडे आळीपाळीनं पाहात आणि त्यांच्या मनात येई. हा हुसेन आपल्या बापासारखा काळा-सावळा, उंच आणि अंगानं मजबूत झाला आहे. आजोळच्या घराण्याचे नाकडोळे आणि वर्ण यानं काही उचलले नाहीत. ही जुलिया मात्र आपल्या आईसारखी झाली आहे. ठेंगणी, ठुसकी, नाजूक, देखणी! आणि पिकलेल्या केवड्याच्या कणसासारखी गोरी पान! सकीनाचं लग्न झालं तेव्हा ती हिच्याएवढीच आणि हुबेहूब अशीच दिसत नसे काय? जाफर जंगचे वडील मौलाना अकबर आपल्या सुनेचा उल्लेख करताना चेष्टेने नेहमी म्हणायचे ''आमच्या जाफरची बाहुली.'' ते नेहमी सितारा मंझिलमधल्या आपल्या मोठ्या किताबखान्यांत कोणत्या तरी ग्रंथात मान खुपसून बसलेले असायचे. खान्याची वर्दी देण्यासाठी दारांत उभी राहिलेली सकीना त्यांना दिसली की ते हसून म्हणायचे, ''आली का आमची बाहुली?'' मग सकीना तिथून धूम पळायची तेव्हा तिचे गाल शरमेनं लालबुंद झालेले असायचे...

मनाशी या आठवणी एकीकडे काढता काढता एका पर्शियन कवीच्या गोष्टी अश्रफ सांगत होते. त्यांच्या चालू गोष्टीतील नायक एके दिवशी बाजारात जाऊन आपल्या प्रियतमेला भेट देण्यासाठी कोणती वस्तू विकत घ्यावी याचा विचार करीत होता. जी वस्तू आपल्या प्रीतीचा निरोप तिला सगळ्यांत उत्तम प्रकारे सांगेल अशी चीज त्याला घ्यायची होती. दुकानांतली एकेक वस्तू हातांत घेऊन तो या दृष्टीनं तिची पारख करीत होता. जुलिया आणि हुसेन यांच्याकडे पाहून अश्रफअली त्या

कवीनं एकेक वस्तू नापसंत करून खाली का ठेवली त्याचं वर्णन करीत होते. ते दोघांना म्हणाले, ''अखेर त्या कवीनं काय पसंत केलं आणि ते का ते आता तुम्ही सांगितलं पाहिजे. तुम्ही दोघं प्रेम करायला कितीसे लायक झाला आहात त्याची परीक्षा करणार आहे मी–''

तितक्यात सकीना आपल्या कामांतून नजर वर करून म्हणाली, ''हां, पुरे पुरे अश्रफ, तुझ्या कहानीत नेहमी असला काही तरी चावटपणा असतो.''

अश्रफअली मोठ्यांदा हसले. ते बहिणीला काही तरी विनोदी उत्तर देणार होते. पण तितक्यांत एक नोकर धावत वर आला, आणि म्हणाला, ''मालकांची गाडी दिसू लागली.''

ते ऐकताच ''अच्छा?'' असा उद्‌गार काढून जुलिया एकदम उठली व खिडकीकडे गेली. तिनं मांडीवरून एकाएकी दूर लोटल्यामुळे चमननं आश्चर्याचा धक्का बसल्याप्रमाणे इकडे तिकडे पाहिलं, आणि मग आपल्या ठेंगण्या पायांवर लुगुलुगु चालत तो तिच्या पायाशी जाऊन उभा राहिला.

नोकरानं जेव्हा गाडी पाहिली तेव्हा जाफर जंग शहराच्या पूर्व टोकाशी असलेल्या चौकात होते. जवळ जवळ मध्यरात्र व्हायला आल्यामुळे रस्ते शांत होते. आजुबाजूच्या घरांत दिवे मालविले गेले होते. चौकांतल्या सिनेमा थिएटरांतला खेळ संपायला थोडा अवकाश होता. तो संपायच्या वेळेस थिएटरच्या दारावरचे सारे दिवे पुन्हा प्रज्वलित होणार होते. पण आता त्यांची विश्रांती चालू होती. खाद्यपेयं विकणाऱ्या फेरीवाल्यांचे चार सहा हातगाडे रस्त्यात उभे होते. पानपट्टीची दुकानं उघडी होती. त्यापुढच्या बाकड्यांवर बसून काही लोक पान चघळीत गप्पा मारीत होते. चौकात एवढीच वर्दळ होती. तिच्यांत एकही हिंदू व्यक्ती दिसत नव्हती. जमाना बदलला होता. पूर्वीच्या दिवसांत शहरांतले हिंदू मुसलमानांच्या बरोबरीनं अष्टौप्रहर रस्त्यात, बाजारात,चौकांत, देवळांमशिदींपुढे वावरताना जाफरजंगनी पाहिले होते. ते दिवस झपाट्यानं गेले होते. पद्धतशीरपणाने घालविण्यात आले होते. आता पुन्हा सहसा डोके वर काढणार नव्हतं... जाफर जंगनी समाधानाचा सुस्कारा सोडला. ज्या लोकांनी शहराचं पूर्वीचं रूप पुसून टाकलं त्या लोकांबद्दल त्यांना आदर आणि आत्मीयता होती. ते जे करीत आहेत त्याला हातभार लावून आपण अधिकाधिक संपत्ती आणि मानमरातब मिळविणार आहोत ही गोष्ट त्यांनी हमेशा मनांत वागविली होती...



गाडी सपाट्यानं पुढे चालली होती, आणि शहराचा विस्तार ओलांडून पश्चिमेच्या टोकाकडे जात होती. तीन चार मिनिटं झाली नाहीत तोच ती सितारा मंझिलच्या गेटांतून आत शिरली. बगीच्याच्या मधोमध कारंजं होतं त्याच्या डाव्या अंगच्या चढत्या वाटेवरची वाळू करकर वाजवीत वर गेली, आणि पोर्चमध्ये जाऊन थांबली.

जुलिया एवढ्यांत खाली येऊन पायरीवर उभी होती. चमन खालच्या पायरीवर खडा होता. जाफर जंग गाडीतून उतरल्याबरोबर तो पुढे झाला, आणि त्यांच्या गरम उंची शेरवानीच्या टोकापर्यंत कसेबसे पुरणारे आपले पुढचे पाय वर करून आनंदाचं आवाज काढू लागला.

जुलियानं बापाला किंचित दटावून म्हटलं, ''तुमची किती वाट पाहायची आम्ही, काही सुमार?''

''माफ कर बेटी'' असं म्हणून जाफर जंगनी तिच्या खांद्यावर हात ठेवला व मग तिला घेऊन हॉलमधून भराभर पावलं टाकून प्रशस्त जिन्याच्या कारपेटनं आच्छादलेल्या पायऱ्या ते चढू लागले. त्या दोघांच्या पायांतून लगबगीनं वाट काढून मालक आल्याची वर्दी वर पोचविण्यासाठी चमन केव्हाच पसार झाला होता.

जुलिया बापाला म्हणाली, ''एक पाहुणे आले आहेत.''

जाफर जंगनी विचारलं, ''अच्छा?''

''कोण आले आहेत ओळखा पाहू?''

जाफर जंग हसले आणि म्हणाले, ''मी दिवसभर काम करून दमलो आहे. तुझी कोडी सोडविण्याइतकी हुशारी मला वाटत नाही. तूच सांग. कोण मेहमान आले आहेत?''

''आपलं अश्रफमामू.''

''अच्छा?''

''उद्या हुसेनचा वाढदिवस आहे ना म्हणून.''

हुसेनचं नाव ऐकताच जाफर जंगच्या चेहऱ्यावरचं हास्य मावळलं. त्यांच्या कपाळावर आठीदेखील चढली, असं जुलियाला वाटलं. त्याचा तिला चमत्कार वाटला. ती काही बोलली नाही. पण जिन्याच्या उरलेल्या पायऱ्या चढता चढता ती मनाशी आश्चर्य करीत राहिली.